**<u>ठळक बातम्या</u>**

- २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेची अधिसूचना जारी

- कार्यक्षमता, वेग आणि अचूकता यांच्या बळावर भारत आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी बजावत असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- अहमदाबाद विमान अपघाताच्या पार्श्वभूमीवर स्थापन झालेल्या उच्चस्तरीय समितीची पहिली बैठक आज नवी दिल्लीत/ गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या पार्थिवावर आज राजकोटमधे अंत्यसंस्कार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सायप्रसचा 'ग्रँड कोलार ऑफ दी ऑर्डर ऑफ दी मकारिओस थर्ड' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान

**आणि**

- पश्चिम किनारपट्टीत मुसळधार पावसाचा इशारा

**<><><><>**

२०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेची आणि पहिल्यांदाच समाविष्ट झालेल्या जातनिहाय जनगणनेची अधिकृत अधिसूचना आज राजपत्रात प्रसिद्ध झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली काल दिल्लीत यासंदर्भातल्या तयारीचा आढावा घेण्यात आला. देशभरात ३४ लाख प्रगणक आणि निरीक्षक, एक लाख तीन हजारांहून जास्त अधिकारी आधुनिक मोबाईल डिजिटल प्रणालीद्वारे या प्रक्रियेत सहभागी होणार आहेत. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरांची यादी, मालमत्ता आणि सुविधा या माहितीचं संकलन, दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक-आर्थिक आणि जात विषयक माहिती संकलित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमध्ये डिजिटल ॲप आणि स्व-गणनेची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे. देशातल्या बर्फाळ प्रदेशात एक ऑक्टोबर २०२६ पासून, तर इतर भागात एक मार्च २०२७ पासून जनगणना सुरू होणार आहे.

**<><><><>**

गेल्या दहा वर्षात भारताने आपली कार्यक्षमता, वेग आणि अचूक व्यवस्थापन यांच्या बळावर आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केल्याचं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्ली इथे राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मदतकार्य आयुक्त आणि आपत्ती प्रतिसाद दलांच्या परिषदेला संबोधित करत होते.

**- होल्ड - बाईट - अमित शहा- -**

विविध प्रकारच्या संकटांमध्ये बचावकार्य करण्यासाठी जिल्हा पातळीवर आपत्ती व्यवस्थापन योजना असणं महत्त्वाचं आहे, असं सांगताना विविध राज्यांच्या मदतकार्य आयुक्तांना पुढच्या ९० दिवसात प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करण्याच्या सूचनाही शहा यांनी' दिल्या. हवामान बदल आणि जागतिक तापमानवाढीमुळे आज संपूर्ण जगाला संकटं भेडसावत आहेत. गेल्या दहा वर्षांत मात्र, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण NDMA, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल NDRF आणि आपत्ती प्रतिरोधक कोअलिशन CDRI यांच्या बळावर गेल्या दहा वर्षात भारत आपत्ती व्यवस्थापन क्षेत्रात जगाचं नेतृत्व करत आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><>**

अहमदाबाद विमान अपघाताच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीची पहिली बैठक आज नवी दिल्लीत होणार आहे. केंद्रीय गृह सचिव बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील. नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाचे सचिव, गृहमंत्रालयाचे तसंच गुजरात राज्यशासनाचे वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित असतील.

अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी यांचे डीएनए नमुने जुळले असून त्यांच्या पार्थिवावर आज राजकोटमधे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासह अनेक मान्यवरांनी आज रुपाणी यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेऊन आदरांजली वाहिली.

**<><><><>**

पुणे जिल्ह्यात इंद्रायणी नदीवरचा पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाला, तर ५१ जणांना वाचवण्यात यश आलं आहे. त्यापैकी ८ जणांची प्रकृती गंभीर आहे. दोन ते तीन जण अद्यापही बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं असून, या प्रकाराची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबांना राज्य सरकारनं पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. दुर्घटनेतल्या जखमींवरही सरकारी खर्चातून उपचार केले जाणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून जखमींना लवकर बरं वाटावं यासाठी प्रार्थना केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत शहा यांनी परिस्थितीची माहिती घेतली.

<><><><>

नॅशनल जिओस्पेशियल नॉलेज-बेस्ड लँड सर्व्हे ऑफ अर्बन हॅबिटेशन्स, अर्थात नक्शा क्षमता बांधणी कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन भूसंपदा विभागाचे सचिव मनोज जोशी यांच्या हस्ते आज होणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत १२८ नागरी स्थानिक संस्था स्तरावर जिल्हा अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे अधिकारी पुणे, गुवाहाटी, चंदीगड आणि म्हैसूर केंद्रांवर शहरी मालमत्ता सर्वेक्षणासाठी आधुनिक भूस्थानिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी एक आठवड्याचं प्रत्यक्ष प्रशिक्षण देतील. या कार्यक्रमांतर्गत उच्च-अचूकता असलेल्या शहरी जमीन सर्वेक्षणांवर देखरेख करण्यासाठी अधिकारी आणि अन्य  कर्मचाऱ्यांना सुसज्ज करणं, हे प्रशिक्षणाचं उद्दिष्ट असल्याचं ग्रामीण विकास मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सायप्रसचा ‘ग्रँड कोलार ऑफ दी ऑर्डर ऑफ दी मकारिओस थर्ड’ हा सर्वोच्च नागरी सन्मान आज सायप्रसचे राष्ट्राध्यक्ष निकोस क्रिस्तोदौलिदेस यांनी प्रदान केला. सायप्रसचे पहिले राष्ट्राध्यक्ष आर्चबिशप मकारिओस थर्ड यांच्या नावाचा हा पुरस्कार विविध देशाच्या प्रमुख आणि नामवंत व्यक्तींना त्यांच्या अतुलनीय कार्यासाठी दिला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी कालपासून पाच दिवसांच्या सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांच्या दौऱ्यावर आहेत. सायप्रस मध्ये गेल्या 23 वर्षातील भारताच्या प्रधानमंत्र्यांची ही पहिली भेट आहे. मोदी यांनी काल लिमासोलमध्ये व्यापार विषयक परिषदेत सहभाग घेतला आणि उपस्थितांना संबोधित केलं.

<><><><>

इस्त्रायल - इराण युद्धाचा आज चौथा दिवस आहे. तणाव कमी करण्याच्या अनेक देशांच्या आवाहनानंतरही दोन्ही बाजूंनी रात्रभर क्षेपणास्त्रांचा मारा सुरुच होता. आज सकाळी इस्त्रायली तेल शुद्धीकरण प्रकल्पांवर हल्ला झाला त्यामुळे पॉवर ग्रिडचा काही भाग खराब झाला. इराणच्या हल्ल्यांमुळे इस्त्रायलचे २० जण ठार झाले असून ३८० जण, मॅगेन डेव्हिड अॅडोम या इस्त्राएली सूत्रांनी दिली. इस्त्रायली हल्ल्यांमुळे इराणमध्ये किमान २२४ जणांचा मृत्यू झाला आहे आणि बाराशे पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले आहेत. इस्त्रायलला पाश्चात्य देशांनी मदत केल्यास संपूर्ण प्रदेशातील अमेरिका, ब्रिटन आणि फ्रेंच लष्करी मालमत्तेला लक्ष्य केलं जाऊ शकतं, असा इशारा इराणने दिल्यामुळे तणाव वाढला आहे.

<><><><>

आयसीसी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं महिलांच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या तारखांची घोषणा केली आहे. या स्पर्धेची सुरुवात येत्या ३० सप्टेंबर रोजी बेंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर होईल. स्पर्धेचा पहिला सामना भारत आणि श्रीलंका या दोन संघांमध्ये खेळवला जाईल. या स्पर्धेची उपांत्य फेरी २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी होणार असून अंतिम सामना २ नोव्हेंबर रोजी खेळवला जाईल. स्पर्धेतला बहुप्रतिक्षित भारत विरुद्ध पाकिस्तान हा सामना येत्या ५ ऑक्टोबर रोजी होणार आहे. हा सामना श्रीलंकेत आर. प्रेमदासा स्टेडियमवर दुपारी ३ वाजता सुरू होईल.

<><><><>

देशाच्या पश्चिम किनारपट्टीवर आज जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. दिल्ली, हरियाणा, पंजाब आणि गुजरातमध्ये पुढील दोन दिवस जोरदार वारे आणि पाऊस पडेल. वायव्येकडची राज्यं आणि दिल्लीत काल तापमान कमी झालं. मान्सून

अद्याप पुढे सरकला  नसला तरी कोकण, गोवा आणि कर्नाटकच्या किनारीभागात जोरदार पाऊस पडत आहे, अशी माहिती हवामान विभागाचे ज्येष्ठ वैज्ञानिक आर के ज्ञानमणी यांनी आकाशवाणीला दिली.

**<><><><>**

महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी पावसानं जोर धरला असून जनजीवनावर परिणाम झाला आहे. राज्यातल्या शाळा आजपासूनच सुरु झाल्या, त्यामुळे अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांची आणि पालकांची पावसानं तारांबळ उडवली. मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात अधूनमधून पावसाच्या सरी येत असून पुढचे दोन दिवस हीच स्थिती कायम राहण्याचा अंदाज हवामानशास्त्र विभागानं व्यक्त केला आहे.  रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातल्या अनेक नद्यांना पूर आला आहे.

**<><><><>**

केरळमध्ये मुसळधार पाऊस पडत असून राज्याच्या उत्तर भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. अतिमुसळधार पावसाच्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर ११ जिल्ह्यातील शाळांना आज सुट्टी जाहीर केली आहे.

**//<><><><>//**